शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तक्रार अर्ज क्रं.६९/२०१९

| | | |
|---|---|---|
| श्री.शिंदे दत्तात्रय शंकर<br>मु.पो.सांगवड, ता.पाटण, जि.सातारा | } | तक्रार अर्जदार |

विरूध्द्

| | | |
|---|---|---|
| १. कोयना शिक्षण संस्था, पाटण,<br>जि.सातारा<br>२. बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण,<br>जि.सातारा | } | वि.प. |

कोयना शिक्षण संस्था, पाटण, जि. सातारा यांचेकडील शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. शिंदे दत्तात्रय शंकर यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.१३/०३/२०१९ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार खालील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

१. सन ०१/०१/२०१९ पासून रोज कामावर पूर्ण वेळ उपस्थित असून देखील हजेरी पत्रक (मस्टर) सहीसाठी दिलेले नाही. २. माहे फेब्रुवारी २०१९ पासूनचा पगार अदा केलेला नाही. या संबधित प्राचार्यांनी वारंवार लेखी व तोंडी विनंती करून देखील कार्यवाही न केल्यामुळे तक्रार अर्ज देत आहे.

**संस्थेचा अभिप्राय :**

संबंधित सेवक महाविद्यालयाच्या कायम अथवा मंजूर पदावर कार्यरत नाही.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

महाविद्यालयाने अभिप्राय दिलेला नाही.

**समितीची निरिक्षणे :**

प्रस्तुतची तक्रार तक्रारदारने त्यास महाविद्यालय व संस्थेने दि. १/२/२०१९ पासून पूर्णवेळ कामावर उपस्थित असून देखील हजेरी पत्रकावर सही करून दिलेली नाही. तसेच माहे

फेब्रुवारी २०१९ चा पगार अदा केलेला नाही अशी तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार हा जाब देणार क्र.२ कोयना शिक्षण संस्था, पाटण या संस्थेत शिपाई म्हणून कार्यरत आहे.

जाब देणार यांचे कथन थोडक्यात असे की, तक्रारदार कोणत्याही मान्यता प्राप्त कायम पदावर कार्यरत नसलेने त्यांला या समितीपुढे तक्रार मांडणेचा कोणताही अधिकार नाही त्यामुळे सदरची तक्रार कायद्याने चालणेस पात्र नाही. प्रस्तुतची तक्रार ही सुडबुध्दीने दाखल केली असुन तक्रार दाखल करणेस कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही जरी तक्रारदार शिक्षण संस्थेत सेवक म्हणून नेमणूकीस असला तरी त्याने स्वतः हून दि. २/११/२०१६ पासून जाब देणार क्र.२ महाविद्यालयात काम करणेस स्वेच्छेने मागणी केली त्यानुसार ते काम करित आहेत. तक्रारदाराने विद्यापीठ न्यायाधिकरण पुणे यांचे समोर अपील कं. ८/२०१९ हे त्यांच्या निलंबना करिता दाखल केले असून ते अद्याप प्रलंबीत आहे त्यामुळे प्रस्तुतची तक्रार या समितीपुढे चालण्यास प्राप्त नाही. या तक्रारीत तक्रारदाराने उपस्थिती केलेले मुद्दे सदर अपीलात नमूद केले आहेत. सबब ही तक्रार चालणेस पात्र नाही.

गैरअर्जदारांनी आपल्या लेखी उत्तरात जे इतरही काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत ते, ही समिति यापूढे जे मत व्यक्त करीत आहे त्यानुसार गैरलागू असलेने त्याचा विस्तृत उल्लेख टाळण्यात आला आहे.

उभय बाजूचा युक्तीवाद ऐकुन घेतलेनंतर समितीच्या निर्देशनास आलेले की, प्रस्तुत तक्रारदाराने यापूर्वी या समितीसमोर एक तक्रार, तक्रार अर्ज कं.५१/२०१८ दाखल केला होता व त्या तक्रार अर्जाचा निकाल दि.३१.०७.२०२३ रोजी लागलेला असुन त्या निकालानुसार या समितीने तक्रारदारास जाब देणार यांनी मार्च २०१४ पासुन सहावा वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार त्यास पगार व इतर भत्ते द्यावेत असा आदेश केलेला आहे. त्या आदेशानुसार या तक्रार अर्जातील मागणी क्र.२ 'माहे फेब्रुवारी २०१९ पासुनचा पगार अदा केलेला नाही' ही मागणी त्यात समाविष्ठ आहे, जी मागणी अगोदरच मान्य केली आहे त्या मागणीचा पुर्नविचार करण्याची या प्रकरणी गरज नाही असा या समितीचे स्पष्ट मत आहे. तसेच तक्रारदाराने विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांचे समोर दाखल केलेल्या अपील क्र.८/२०२१ या अपीलाच्या अपील मेमोचे अवलोकन करता त्यातुन स्पष्ट दिसुन येते की, त्या अपीलात तक्रारदाराने आपणास दि.०१/०२/२०१९ पासून हजेरी पत्रकावर सही करू दिलेली नाही असे आरोप केलेले आहेत. त्यास सेवेतुन निष्काशीत करण्याकरिता घेतलेल्या अनेक कारणांपैकी एक

कारण हे देखील आहे. सबब हया तक्रार अर्जात नमुद केलेली मागणीही हया समितीपेक्षा वरीष्ठ न्यायाधिकरणापूढे प्रलंबीत आहे. अशा परिस्थितीत सदर मागणीचा विचार हया समितीला करता येणार नाही असे हया समितीचे नम्र मत आहे. सबब या प्रकरणी तक्रारदार यांच्या दोन्हीही मागण्या विचारात घेता येत नाही असे या समितीचे मत आहे. त्यामुळे प्रस्तुतची तक्रार खारीज करावी लागेल असे या समितीचे मत आहे. सबब खालील आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश**

प्रस्तुतची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

दिनांक : 27 SEP 2023

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोळेकर )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)